महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
मत्स्य विज्ञान महाविद्यालय,
हजारी पहाड रोड, सेमीनरी हिल्स्, नागपूर—०६

डॉ. पी. ए. तेलवेकर
सहयोगी अधिष्ठाता

दुरध्वनी क्रमांकः ०७१२—२५६७१९२
**E-mail:** adcofsngp@mafsu.ac.in

मविम/NFDB/प्रशिक्षण/ सूचना/५८६/२०२६

दि. १०/०७/२०२६.

## :: प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रवेश सूचना ::

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे "Hatchery Production and Grow-out Culture of Indian Major Carps (IMC)" या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास राष्ट्रीय विकास महामंडळ, हैदराबाद यांचे अर्थसहाय्य प्राप्त झाले असून हा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णपणे निःशुल्क आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम दि. २८/०७/२०२६ ते ३०/०७/२०२६ या कालावधीत मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी एकूण ५० प्रशिक्षणार्थींची निवड राष्ट्रीय विकास महामंडळ, हैदराबाद यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येईल.

इच्छुक व पात्र लाभार्थींनी खाली नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक कागदपत्रांसह मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे नोंदणी करावी.

**राष्ट्रीय विकास महामंडळ, हैदराबाद यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र प्रशिक्षणार्थी**

१. मासेमारी व्यवसाय करणारे व्यक्ती.
२. मत्स्यपालन व्यवसाय करणारे मत्स्यपालक.
३. मासे प्रक्रिया, खरेदी-विक्री, वाहतूक किंवा विपणन व्यवसायाशी संबंधित व्यक्ती.
४. मत्स्य क्षेत्रातील बचत गट (Self Help Group - SHG) किंवा संयुक्त दायित्व गट (Joint Liability Group - JLG) यांचे सदस्य.
५. मच्छीमार सहकारी संस्था किंवा मच्छीमार महिला सहकारी संस्थांचे सदस्य.
६. मत्स्य क्षेत्रातील एफएफपीओ (FFPO), सागर मित्र व मत्स्य सेवा मित्र.
७. कृषी किंवा संबंधित व्यवसाय करणारे शेतकरी, ज्यांच्यासाठी जलसंवर्धन किंवा मत्स्यपालन हे अतिरिक्त उत्पन्नाचे साधन आहे.
८. मत्स्य व्यवसायाशी संबंधित विभागातील क्षेत्रीय, विस्तार किंवा वरिष्ठ स्तरावरील अधिकारी.
९. मत्स्य क्षेत्राशी संबंधित उद्योजक अथवा भागधारक, जसे की सी-विड (Seaweed) संवर्धन, अलंकारिक (Ornamental) मत्स्यपालन तसेच मत्स्य मूल्यसाखळी (Fisheries Value Chain) मधील उद्योजक.

वरील मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र लाभार्थींनी आवश्यक कागदपत्रांसह मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे आपली नोंदणी करावी.

**अधिक माहितीसाठी खालील समन्वयकांशी संपर्क साधावा.**

समन्वयक : डॉ. उमेश सूर्यवंशी
मो. क्र. ९१४६४०७०००
सह-समन्वयक : श्री. अरविंद कुलकर्णी
मो. क्र. ९८६०४६३५८०

**सहयोगी अधिष्ठाता**
**मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर**